# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. २० अंतर्गत ठक्करग्राम, पाचपावली येथील जुनी
**{सा.बां.विभाग }** महानगरपालिका शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने ठक्करग्राम, पाचपावली, जुनी महानगरपालिका शाळेची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याकरिता सादर.

टिप :-

१. प्रभाग क्र. २० अंतर्गत ठक्करग्राम, पाचपावली स्थित जुनी महानगरपालिका शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण झालेली असून, सार्वजनिक सुरक्षितेच्या संभाव्य धोका टाळण्याच्या दृष्टीने तोडण्यात येत असून त्या ठिकाणी जुनी महानगरपालिका शाळेच्या जागेवर ई – लायब्ररीचे बांधकाम करण्यात येत आहे.
२. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट नस्तीत संलग्न आहे.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 13/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 22/12/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (डी.पी.डी.सी.), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २० अंतर्गत ठक्करग्राम, पाचपावली येथील जुनी महानगरपालिका शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने ठक्करग्राम, पाचपावली, जुनी महानगरपालिका शाळेची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

हस्ता/-
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**